महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

☎- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☎ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 327 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 24 / 08 / 2025

# "नांदेड जिल्हा पोलीस फिट इंडिया आणि सामाजिक सलोखा भव्य सायक्लोथॉन स्पर्धा उत्साहात संपन्न"

भारत सरकारच्या क्रिडा विभागाच्या निर्देशानूसार व ''फिट इंडिया'' मोहिमे अंतर्गत सर्व पोलीस युनिट्सकडून ''फिट इंडिया सायकलींग ड्राइव्ह'' हा विशेष उपक्रम राबविणे बाबत निर्देश प्राप्त झाले त्या अनुषंगाने मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली फिट इंडिया मोहिमे अंतर्गत नांदेड पोलीस दलाचे वतीने दिनांक 24 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 06.30 वा. चे सुमारास पोलीस मुख्यालय नांदेड येथुन–तिरंगा चौक–वजिराबाद चौक–कलामंदिर–शिवाजीनगर–आयटीआय चौक–श्रीनगर–वर्कशॉप टि पॉईट–भाग्यनगर–आनंद नगर–श्री वसंतराव नाईक टि पॉईट–अण्णाभाऊ साठे चौक–हिंगोली गेट ओव्हर ब्रिज–तहसील कार्यालय–चिखलवाडी–महावीर चौक–वजिराबाद चौक–तिरंगा चौक–पोलीस मुख्यालय या मार्गावर ''फिटनेस की डोस आधा घंटा रोज'' या संदेशाचा प्रसार करणे व फिटनेसला दैनंदिन जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनविने कामी सायक्लोथॉन स्पर्धा आयोजीत करण्यात आली स्पर्धेस मा. श्री शहाजी उमाप, पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा. श्री राहुल कर्डीले, जिल्हाधिकारी, नांदेड यांनी हिरवी झेंडी दाखवुन पोलीस मुख्यालय येथुन सुरूवात करण्यात आली.

सदर सायक्लोथॉन स्पर्धे मध्ये अनेक महाविद्यालयातील युवक / युवती, शाळेतील शिक्षक विदयार्थी, एनसीसी कॅडेट्स, नागरीक व पोलीस असे अंदाजे एक हजार ते बाराशे जनांनी उत्साहात सहभाग नोंदविला. सदर सायक्लोथॉन स्पर्धे मध्ये सहभाग घेतलेल्या स्पर्धकांपैकी 1)नैतीक महेश चौलवार यांनी प्रथम क्रमांक 2)विष्णु पवार यांनी व्दितीय क्रमांक व 3)दुर्वेश निखली कोळी यांनी तृतीय क्रमांक पटकावीला विजेता ठरलेल्या स्पर्धकांना मान्यवरांचे हस्ते मेडल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवुन सन्मानीत करण्यात आले. शाळा, महादियालयाचे प्रतिनिधी शिक्षकांना सुध्दा सन्मानचिन्ह व प्रशस्ती पत्र देवुन सन्मानीत करण्यात आले. सायक्लोथॉन स्पर्धे मध्ये सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना मेडल व प्रशस्ती पत्र देण्यात आले. सायक्लोथॉन दरम्याण स्पर्धकांसाठी जागोजागी अल्पोपहाराची व पिण्याचे पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

सदर रॅलीसाठी मा. श्री शहाजी उमाप, पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड, मा. श्री. राहुल कर्डीले, जिल्हाधिकारी, नांदेड, मा. श्री अशोक महाजन, प्र.कुलगुरू स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, मा. श्री सतेंद्र आउलवार, समाज कल्याण अधिकारी, नांदेड, मा. श्री. दिलीपकुमार बनसोडे, शिक्षणाधिकारी, नांदेड, मा. श्री. निलेश शेवाळकर, जि. एस. टी. सह आयुक्त, नांदेड, मा. श्री डॉ. देवेंद्र पालीवाल, अध्यक्ष सायकलीस्ट क्लब, नांदेड असे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड, मा. श्री रामेश्वर वेंजने, उप विभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर, श्रीमती अश्विनी जगताप, उप विभागीय पोलीस अधिकारी कंधार, श्री उदय खंडेराय, पो.नि.स्थागुशा, रापोनि / श्री. विजय धोंडगे, पोनि / श्री शेंडगे, श्री वसंत सप्रे, पो.नि. सायबर,सपोनि / भागवत नागरगोजे, पोउपनि / मारोती चव्हाण, खंडु दर्शने, पोहेका / संतोष सोनसळे, पोकॉ / गजानन फुलारी यांनी पार पाडले आणि कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राध्यापक श्री संतोष देवराये यांनी केले आहे

जनसंपर्क अधिकारी,<br>
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड